॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. २७ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक २६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


* सुविचार *

गेलेला वेळ कधीच परत येत नाही, म्हणून प्रत्येक क्षणाचा उपयोग भविष्य घडवण्यासाठी करा.

## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

**लोह-चुंबक**

गुण इथे जुळतच नाही
जुळतात फक्त नखरे
नात्यातून शोधले जातात
नुसते केवळ बकरे
पेशामध्ये सूख नाही
प्रेमाची सांगते धून
लग्नाहून सोपा वाटतो
नव्या पिढीला खून

वीरभूमी

# अहिल्यानगरमध्ये मोहरमची विसर्जन मिरवणूक शांततेत

## मिरवणुकीवर ड्रोन कॅमेरे आणि साध्या वेशातील पोलिसांचे विशेष लक्ष

● **अहिल्यानगर । वीरभूमी -**

शहरातील ऐतिहासिक आणि शतकाची परंपरा लाभलेल्या मोहरम सणाच्या मुख्य विसर्जन मिरवणुकीला आज, २६ जून रोजी दुपारी १२ वाजता कोठला येथून मोठ्या भावूक आणि उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. या मिरवणुकीचे सावेडीत विसर्जन होणार आहे.

मुख्य विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून ड्रोन कॅमेरे आणि साध्या वेशातील पोलिसांसह शेकडो कर्मचाऱ्यांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

इमाम हसेन यांच्या बलिदानाचा गौरव करीत २५ जून रोजी रात्री १२ वाजता कोठला येथील इमामवाड्यातून मानाच्या सवाऱ्या मार्गस्थ झाल्या. यावेळी ५ मानाचे टेंभे पेटविण्यात आले होते. ढोल-ताशांच्या पारंपरिक गजरात निघालेल्या या मिरवणुकीत तरुणांनी मातम करत शोक व्यक्त केला. ही मिरवणूक फलटण चौकी परिसरात आली असता सवारी घेण्यावरुन काही काळ किरकोळ गोंधळ उडाला होता, मात्र पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करत मिरवणूक पुढे मार्गस्थ केली.

ही मिरवणूक राज चेंबर, मंगलगेट, आडते बाजार, तेलीखुंट, कापड बाजार, मोची गल्ली, भिंगारवाला चौक, गांधी मैदान, पटवर्धन चौक, जुना कोर्ट, पंचवीर चावडी, जुना मंगळवार बाजार, हातमपुरा, रामचंद्र खुंट रोड मार्गे आज २६ जून रोजी सकाळी १० वाजता पुन्हा कोठला येथील इमामवाड्यात पोहोचली आणि सवारी शांततेत विसावल्या.



कतलची रात्र मिरवणूक संपल्यानंतर अवघ्या दोन तासांत, म्हणजेच आज दुपारी १२ वाजता मोहरमच्या मुख्य विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. सायंकाळपर्यंतम ही मिरवणूक पंचपीर चावडीपर्यंत पोहोचली होती. दरम्यान मंगलगेट येथे दोन्ही सवाऱ्या एकत्र आल्या. यावेळी या हुसने यांचा जोरदार जयघोष करण्यात आला. सवारीला खांदा देण्यासाठी तरुणाई सरसावल्याचे दिसून आले.

मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी हिंदू समाजाच्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी पिण्याचे पाणी आणि सरबत वाटप करून धार्मिक सलोख्याचे आणि सेवेचे एक उत्तम उदाहरण पेश करण्यात आले.

कोठला, फलटण चौकी, बारा इमाम हवेली, मंगलगेट, आडते बाजार, पिंजार गल्ली, पारशा खुंट, जुना कापड बाजार, खिस्त गल्ली, बुरुड गल्ली, जुना बाजार, पंचपीर चावडी, जुनी मनपा, दो बोटी चिरा मस्जिद, कोर्ट मागील रस्ता, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, नीलक्रांती चौक, बालिकाश्रम रोड, बारा इमाम बारव ते सावेडी गाव या मार्गाने ही मिरवणूक पार पडणार आहे.

मिरवणुकीवर ड्रोन आणि ८५० हून अधिक पोलीस नजर ठेवून आहेत. मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. संवेदनशील आणि अतिसंवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, २ अप्पर पोलीस अधीक्षक, ५ पोलीस उपअधीक्षक आणि २१ पोलीस निरीक्षक, ८५० पोलीस अंमलदार प्रत्यक्ष रस्त्यावर तैनात आहेत. शहरातील उंच इमारतींवरून पोलीस लक्ष ठेवून आहेत, तर संपूर्ण मिरवणुकीवर ड्रोन आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वॉच आहे. अनेक पोलीस खाकी गणवेशासह साध्या वेशात मिरवणुकीत गस्त घालत होते.

## SPOT NEWS

### नववीच्या समाजशास्त्रातून संविधानाची प्रस्तावना हटवली

● **नवी दिल्ली** - एनसीईआरटीने नववीच्या सामाजिक विज्ञानाच्या पुस्तकातून संविधानाची प्रस्तावना काढून टाकली आहे. याशिवाय सोशलिस्ट (समाजवादी) आणि सेक्युलर (धर्मनिरपेक्ष) या शब्दांचाही उल्लेख नाही. पुस्तकात आणीबाणीवर एक वेगळा विभाग जोडला आहे. ही माहिती नुकतीच समोर आली. पुस्तकातील 'अंडरस्टँडिंग सोसायटी: इंडिया अँड बियॉन्ड' या प्रकरणात आणीबाणीला लोकशाहीसमोर आलेल्या सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हटले आहे. तथापि, यात संविधानाची चर्चा त्याच्या निर्मिती, लोकशाही संस्था आणि मूलभूत अधिकारांच्या माध्यमातून केली आहे, परंतु सार्वभौम (संप्रभुता), 'समाजवादी' (समाजवादी), 'धर्मनिरपेक्ष' (पंथनिरपेक्ष/धर्मनिरपेक्ष), 'लोकशाही' (लोकतांत्रिक) आणि 'गणराज्य' (गणराज्य) यांसारख्या शब्दांबद्दल माहिती दिलेली नाही. ९ वीच्या पुस्तकात लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या भूमिकेचेही सविस्तर वर्णन केले आहे.

### राम मंदिर ट्रस्टचे चंपत राय, मिश्रांचा राजीनामा

● **अयोध्या** - अयोध्येतील राम मंदिरातील कोट्यवधी रुपयांच्या देणगीवर डल्ला मारल्या प्रकरणी ट्रस्टचे सदस्य कृष्ण मोहन यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर मंदिर ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांनी ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला. चंपत राय यांच्यासोबत विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनीही आपल्या पदाचा राजीनामा दिला.

## आयोगाने कोणतेही एकतर्फी निर्णय घेऊ नये

● **पुणे । वीरभूमी -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षा ऑनलाइन घेण्याच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता आहे. मात्र आयोगाने कोणतेही एकतर्फी निर्णय घेऊ नयेत. विद्यार्थ्यांबरोबर व्यापक चर्चा करूनच योग्य तो निर्णय घ्यावा अशी सूचना आयोगाच्या अध्यक्षांना केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे शुक्रवारी दिली.

दरम्यान या प्रश्न राजकीय नाही. एमपीएसीच्या परीक्षांमध्ये मोठे बदल केले जाणार आहेत. ही स्पर्धा पारदर्शी आणि नियोजित वेळेत व्हावी यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. त्यामुळे या निर्णयावरून खासगी शिकवणी चालकांनी त्यासाठी विद्यार्थ्यांना वेठीस धरू नये असा इशाराही त्यांनी दिला. सारथीच्या वतीने यूपीएससी आणि एमपीएससी मधील यशस्वी विद्यार्थी आणि त्यांच्या पालक सत्कार समारंभात ते बोलत होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील महापौर मंजुशा नागपुरे यांच्यासह विविध प्रशासकीय अधिकारी सारथीचे अधिकारी आणि आमदार उपस्थित होते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांनी विविध स्पर्धा परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यावरून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांमध्ये अव्यस्थता आहे. यासंदर्भात आयोगाच्या अध्यक्षांबरोबर बोलणे झाले आहे. पुढील वर्षापासून नीट ची परीक्षा ही ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. एकतर्फी निर्णय संभ्रम निर्माण करतात तर चर्चेतून झालेले निर्णय विश्वासाचे आणि योग्य ठरतात. त्यामुळे एकतर्फी निर्णय घेऊ नये असे अध्यक्षांना सांगितले आहे. ते चर्चा करूनच निर्णय घेतील असे फडणवीस यांनी सांगितले.

एमपीएससी परीक्षा पारदर्शी आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीने काही निर्णय घेण्यात येतील असेही त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले मराठा समाजातील, तसेच विस्थापित आणि आर्थिक मागास वर्गातील युवक आणि युवतींना पुढे आणण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने बार्टीच्या धर्तीवर सारथी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. अलीकडे एक समाज दुसऱ्या समाजाबरोबर स्पर्धा करत असल्याचे चित्र दाखविले जात आहे.

## अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांसाठी २१ कोटी ३० लाख रुपयांच्या मदतीस मंजुरी

● **अहिल्यानगर । वीरभूमी -**

एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे बाधित झालेल्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी २१ कोटी ३० लाख ३७ हजार ४०० रुपयांच्या अनुदानास शासनाने मंजुरी दिली असून, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सादर केलेल्या अंतिम सुधारित अहवालानुसार जिल्ह्यातील १९९ गावांतील २१ हजार ४९५ शेतकरी या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले असून, १२ हजार ३४६.३९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. तालुकानिहाय आकडेवारीनुसार नेवासा तालुक्यात सर्वाधिक १० हजार २९४ शेतकरी व ६ हजार ३३५.७२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्याखालोखाल राहुरी, पारनेर, राहाता व कोपरगाव तालुक्यांमध्येही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

ही मदत शासनाच्या २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकांसाठी मंजूर करण्यात आली आहे. त्यानुसार जिरायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर ८ हजार ५०० रुपये, बागायत क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर १७ हजार रुपये व फळबाग क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर २२ हजार ५०० रुपये या दराने अनुदान देण्यात येणार आहे.

चालू हंगामात यापूर्वी वितरित करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या मंजूर निधीचा समावेश नसल्याची खात्री करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच एका हंगामात विहित दराने केवळ एकदाच मदत देण्यात येईल, याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत.

लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यात येणार असून, कोणत्याही लाभार्थ्यास दुबार मदत मिळणार नाही याची तहसील कार्यालयांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

मंजूर निधीचा वापर केवळ मंजूर उद्देशासाठीच करण्यात यावा. निधी खर्च करताना शासन निर्णयातील सर्व सूचना, निकष, अटी व शर्तीचे काटेकोर पालन करावे. नैसर्गिक आपत्तीबाबत विहित अटींची पूर्तता झाल्यानंतरच मदतीचे वितरण करण्यात यावे, अशा सूचनाही आदेशात देण्यात आल्या आहेत.

# तीन महिन्यांपासून फरार असलेल्या मुख्य आरोपी एकनाथ आटकरला अखेर अटक

## चिचोंडी शिराळ जीवघेणा हल्ला प्रकरण । अटकपूर्व जामीन दुसऱ्यांदा फेटाळल्यानंतर पाथर्डी पोलिसांची तातडीची कारवाई

● **पाथर्डी । वीरभूमी -**

चिचोंडी शिराळ येथील शालेय साहित्य वाटपाच्या कार्यक्रमानंतर झालेल्या जीवघेण्या हल्ला प्रकरणातील मुख्य आरोपी तथा मिरी-तिसगाव प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष एकनाथ गोविंद आटकर यांना पाथर्डी पोलिसांनी अखेर अटक केली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून फरार असलेल्या आटकर यांच्या अटकेमुळे पोलिसांना या प्रकरणात मोठे यश मिळाले असून, न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज दुसऱ्यांदा फेटाळताच पाथर्डी पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीच्या मुसक्या आवळल्या.

१ मार्च रोजी चिचोंडी शिराळजवळील तिरमल वस्ती येथील शाळेत संगणक संच वाटपाच्या कार्यक्रमादरम्यान दोन गटांमध्ये तीव्र वाद झाला होता. या वादाचे पर्यवसान हिंसक हल्ल्यात झाले. आटकर गटाने भगवान फुलमाळी आणि भास्कर आटकर यांच्यावर लोखंडी रॉड व हॉकी स्टिकने जीवघेणा हल्ला केला. या भीषण हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले होते.

घटनेनंतर मुख्य आरोपी एकनाथ आटकर हा तब्बल तीन महिने पोलिसांना गुंगारा देत फरार होता. अटकेपासून बचाव करण्यासाठी त्याने प्रथम उच्च




न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आणि त्यानंतर अहिल्यानगर जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. ए. शिंदे यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याचा जामीन अर्ज दुसऱ्यांदा फेटाळून लावला. न्यायालयाचा निर्णय होताच पाथर्डी पोलिसांनी तातडीने कारवाईला सुरुवात केली.

या संवेदनशील प्रकरणाचा तपास पाथर्डी पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर आरोपीच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला. त्यानुसार पोलीस निरीक्षक कोकरे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर यांनी कौशल्यपूर्ण तपास करत अखेर मुख्य आरोपी एकनाथ आटकर याला अटक केली.

### पाथर्डी तालुक्याचे लक्ष लागलेल्या कारवाईने उडाली खळबळ

■ दीर्घकाळ फरार असलेल्या मुख्य आरोपीला अटक करण्यात पाथर्डी पोलिसांना यश आल्याने तालुक्यात या कारवाईची जोरदार चर्चा सुरु आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, या प्रकरणातील इतर फरार सहआरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके सक्रिय झाली असून, लवकरच त्यांनाही अटक केली जाईल, असा विश्वास पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

> गेल्या तीन महिन्यांपासून फरार असलेला मुख्य आरोपी आता पोलिसांच्या ताब्यात आहे. या प्रकरणातील इतरही काही फरार आरोपी अद्याप मोकाट असून, त्यांनाही लवकरच पोलिसांच्या ताब्यात घेतले जाईल.
>
> **- पाथर्डी पोलीस प्रशासन**

## SPOT NEWS

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त केडगावात शाहू विचारांचा जागर

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची जयंती आणि सामाजिक न्याय दिन विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक समता, शिक्षण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर शाहू विचारांनी दुमदुमून गेला. यावेळी विद्यालयाच्या वतीने केडगाव ते शाहूनगर परिसरात भव्य जनजागृती मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थिनींनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मावळे आदींची वेशभूषा परिधान करून आकर्षक जिवंत देखावे सादर केले. राजर्षी शाहू महाराजांचा विजय असो, सामाजिक न्याय दिनाचा विजय असो, झाडे लावा, झाडे जगवा, प्लास्टिकचा वापर टाळा, मुले-मुली एकसमान, दोघांनाही शिकवा छान तसेच स्वच्छता पाळा, रोगराई टाळा अशा विविध सामाजिक संदेशांचे फलक हातात घेऊन विद्यार्थिनींनी परिसरात जनजागृती केली. सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयाच्या वतीने ११० गरजू विद्यार्थिनींना शालेय गणवेश, बूट व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रमेश बजाबा गवळी होते. प्रमुख पाहुणे म्हणून कायझेन अकॅडमीचे संचालक, व्याख्याते व समुपदेशक महेश डाळिम्बकर उपस्थित होते.

### अकोले शहरातील महात्मा गांधी चौकातील

# वाकलेला वीज पोल ठरतोय धोकादायक

**सामाजिक कार्यकर्ते अतुल बोऱ्हाडे यांचा महावितरणवर निष्काळजीपणाचा आरोप । तातडीने पोल बदलण्याची मागणी**

● **अकोले । वीरभूमी –**

अकोले शहरातील अत्यंत वर्दळीच्या महात्मा गांधी चौकातील मुख्य रस्त्यावरील वीज पोल धोकादायकरीत्या वाकला असून, तो कधीही कोसळून मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त होत आहे. महावितरणच्या दुर्लक्षामुळे नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट असून, महावितरण प्रशासन एखाद्या अपघाताची वाट पाहत आहे का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते अतुल बोऱ्हाडे यांनी उपस्थित केला आहे.

महात्मा गांधी चौक हा शहरातील प्रमुख व्यापारी व रहदारीचा परिसर आहे. येथे दिवसभर पादचारी, वाहनचालक, महिला आणि शाळकरी विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. गेल्या काही दिवसांपासून येथील वीज पोल एका बाजूला मोठ्या प्रमाणात झुकला असून, तो केवळ वीज वाहक तारांच्या आधारावर उभा असल्याचे दिसत आहे. वादळी वारा किंवा किरकोळ धक्क्यानेही तो कोसळण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

या गंभीर समस्येकडे महावितरण प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करताना अतुल बोऱ्हाडे म्हणाले, महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारी या मार्गावरून नियमित ये-जा करतात. डोळ्यांसमोर हा धोकादायक पोल दिसत असतानाही कोणतीही कारवाई केली जात नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? नागरिकांच्या जीवाशी खेळ करणारी ही निष्काळजीपणा थांबला पाहिजे. पावसाळ्यात या पोलमुळे मोठा अनर्थ घडू शकतो, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

बोऱ्हाडे आणि अकोलेकरांनी महावितरणने तातडीने या पोलची पाहणी करून तो सरळ करावा किंवा त्याऐवजी नवीन मजबूत पोल बसवावा, अशी मागणी केली आहे. वेळेत कारवाई न झाल्यास आणि भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याला सर्वस्वी महावितरण प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या लढ्याला मिळाले नवे नेतृत्व

## महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी संदीप राजळे यांची नियुक्ती

● **पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील प्रगतिशील कांदा उत्पादक शेतकरी व कृषिमित्र संदीप राजळे यांची महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राज्य कोअर कमिटीचे सदस्य जयदीप भदाणे यांच्या नेतृत्वात ही नियुक्ती करण्यात आली.

राजळे यांच्यावर जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना संघटनेशी जोडणे, त्यांच्या विविध प्रश्नांना प्रभावीपणे शासनापर्यंत पोहोचविणे, संघटना विस्ताराला गती देणे, युवक नेतृत्वाची सक्षम फळी उभी करणे आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असताना कांद्याला मिळणारा बाजारभाव अत्यंत कमी असल्याने अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल होत नाही. परिणामी शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्यामध्ये मोठी नाराजी आहे. अशा परिस्थितीत राजळे यांची नियुक्ती ही केवळ संघटनात्मक पदाची जबाबदारी नसून, शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेऊन त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सक्षमपणे आवाज उठविण्याची मोठी संधी आणि जबाबदारी मानली जात आहे.

या नियुक्तीचे जिल्हाभरातील शेतकरी, सामाजिक, कृषी व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत करण्यात येत असून संदीप राजळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची संघटना अधिक मजबूत होईल आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्रभावीपणे न्याय मिळवून देण्यासाठी नव्या जोमाने कार्य केले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> गाव ते राज्य... शेतकरी एकजूट हा संघटनेचा संदेश अधिक प्रभावीपणे प्रत्येक कांदा उत्पादक शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी ठामपणे मांडून त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने लढा दिला जाईल.
>
> – **संदीप राजळे,** नवनियुक्त जिल्हाध्यक्ष, कांदा उत्पादक शेतकरी संघटना

## लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्यासाठी केडगाव येथे बैठक

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील ऐतिहासिक अप्पू हत्ती चौकात उभारलेल्या अश्वावर आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर सकल मातंग समाज केडगावच्या वतीने शिवाजी मंगल कार्यालय अंबिकानगर येथे मातंग समाजाच्या बैठकिचे रविवार दि. २८ जून रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजन करण्यात आले आहे. केडगाव सकल मातंग समाजाचे समन्वयक प्रा. विशाल पाचारणे यांनी मातंग समाजबांधवांनी मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सदर मेळाव्यास प्रभाग क्र. १५,१६,१७ च्या नगरसेवकांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे अध्यक्ष संतोष साळवे यांनी सांगितले. ड. प्रदीप सकट, राजू बोरगे, महेश लोखंडे, विष्णू लोखंडे, साठे साहेब, संतोष उमाप, राजू डाडर, अक्षय बोरगे, गोरख लोखंडे आदी पदाधिकारी या बैठकीचे नियोजन व व्यवस्थापन पाहत आहे.

## वयाच्या ७५ व्या वर्षीही मधुकरराव बिबवे यांचा वृक्षसंवर्धनाचा ध्यास; शेकडो वृक्षबियांची पेरणी

● **अकोले । वीरभूमी–**

मॉडर्न हायस्कूल, अकोले येथील सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक तथा वृक्षप्रेमी मधुकरराव बिबवे यांनी सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी वसा हाती घेतला आहे. अकोले शहरालगतच्या सातारा डोंगराच्या पायथ्याशी त्यांनी शेकडो वृक्षबियांची ओलसर ठिकाणी पेरणी करून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ केले आहे.

वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही उत्साहाने आणि निसर्गप्रेमाने कार्यरत असलेले मधुकरराव बिबवे यांचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या बिबवे यांनी मॉडर्न हायस्कूल, अकोले येथे तब्बल ३५ वर्षे माध्यमिक शिक्षक म्हणून सेवा बजावली. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसोबतच त्यांनी समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीवही सातत्याने जपली.

अलीकडेच त्यांनी मॉडर्न हायस्कूलचे उपमुख्याध्यापक सुधीर जोशी यांच्या समवेत सातारा डोंगराच्या पायथ्याशी शेकडो वृक्षबियांची पेरणी केली. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जोशी यांनीही मोलाचे सहकार्य केले.



या उपक्रमाविषयी बोलताना मधुकरराव बिबवे म्हणाले, यातील काही बिया जरी रुजल्या आणि त्यांचे वृक्ष झाले, तरी आपल्या श्रमाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळेल. दररोज सकाळी फिरण्यासाठी जाताना ते रस्त्याच्या कडेला विविध वृक्षांच्या बिया पेरतात. भविष्यात अधिकाधिक झाडे उगवून परिसर हिरवागार व्हावा आणि पर्यावरणाचा समतोल राखला जावा, हीच त्यामागील त्यांची प्रामाणिक भावना आहे.

निसर्ग संवर्धनासाठी त्यांची ही अविरत धडपड समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत असून पर्यावरण रक्षणाचा प्रभावी संदेश देणारी आहे. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

यापुढे मॉडर्न हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यासाठी शाळा पुढाकार घेईल आणि मधुकरराव बिबवे यांच्या कार्यात विद्यार्थी सदैव हातभार लावतील, असा विश्वास उपमुख्याध्यापक सुधीर जोशी यांनी व्यक्त केला आहे.

# महाकर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय; शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाला नवी दिशा

**'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'मुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा**

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण विकासाचा कणा असलेला शेतकरी नैसर्गिक संकटे, हवामानातील अनिश्चितता, उत्पादन खर्चात सातत्याने होणारी वाढ आणि बाजारभावातील चढ-उतार अशा विविध आव्हानांना सामोरे जात आहे. या परिस्थितीमुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करून शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्याच्या इतिहासातील ही सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना ठरत असून, लाखो शेतकरी कुटुंबांना तिचा लाभ होणार आहे.

शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती उत्पादनात वाढ झाली तर ग्रामीण बाजारपेठेला चालना मिळते, कृषीपूरक उद्योगांना बळ मिळते आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतात. मात्र अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस तसेच कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे शेती व्यवसाय अधिक जोखमीचा बनला आहे. त्यातच उत्पादन खर्चात सातत्याने वाढ झाल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण अधिक वाढला आहे. अशा परिस्थितीत कर्जमुक्ती ही केवळ आर्थिक मदत नसून शेतकऱ्यांना नव्याने उभारी देणारा विश्वासदायी आधार ठरत आहे.

राज्य शासनाने यापूर्वीही छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ आणि महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ यांसारख्या योजनांद्वारे शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. त्या अनुभवाच्या आधारे नव्या योजनेत काही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. या योजनेत दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीबरोबरच दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठीही विशेष तरतूद करण्यात आली आहे.

या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यामागेही महत्त्वपूर्ण विचार आहे. लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रिय प्रशासन, जलसंधारण, सिंचन व्यवस्था आणि शेती विकासाला प्राधान्य देणाऱ्या अहिल्यादेवींच्या कार्याला अभिवादन म्हणून त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात ही योजना जाहीर करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शासनाची असलेली बांधिलकी या निर्णयातून अधोरेखित होते.

अहिल्यानगर जिल्हा हा राज्यातील महत्त्वाचा कृषिप्रधान जिल्हा आहे. ऊस, कांदा, डाळिंब, द्राक्षे, कापूस, ज्वारी, बाजरी, हरभरा, सोयाबीन, गहू तसेच विविध फळे व भाजीपाला पिकांमुळे जिल्ह्याने कृषी क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार वाढत असला तरी हवामानातील बदल आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यासाठी आणि शेतीतील गुंतवणूक वाढविण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची थेट कर्जमुक्ती, पुनर्गठित व फेरपुनर्गठित पीक कर्जांचा समावेश, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्जासाठी एकवेळ समझोता (ओटीएस), नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ तसेच जमीन धारणेची अट नसणे यासह अनेक लोकाभिमुख तरतुदी करण्यात आल्या आहेत. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आणि पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून आधार प्रमाणीकरण अनिवार्य राहणार आहे.

अनेक पात्र शेतकरी आधार क्रमांक, बँक खात्याची अपूर्ण माहिती किंवा डिजिटल नोंदणीच्या अभावामुळे योजनेच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी आधार क्रमांक, बँक खाते, मोबाईल क्रमांक आणि जमिनीच्या नोंदी अद्ययावत करून मृत कर्जदार खातेदारांच्या वारसांची नोंद करून घेणे आवश्यक आहे. तसेच, आधार क्रमांक नसल्यास तात्काळ आधार नोंदणी करून घ्यावी आणि आधार क्रमांकाशी मोबाईल क्रमांक संलग्न (लिंक) करून घ्यावा, असे प्रशासनाने आवाहन केले आहे.

या ऐतिहासिक निर्णयाचा लाभ घेत शेतकऱ्यांनी नव्या उत्साहाने शेती व्यवसायात पुढे यावे, अधिक उत्पादक व शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हा या योजनेचा मूलभूत उद्देश आहे.

शेतकरी सशक्त झाला तर ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम झाली तर राज्याच्या सर्वांगीण विकासाला नवी गती मिळेल. याच व्यापक दृष्टिकोनातून राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय महाराष्ट्राच्या कृषी विकासाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

SPOT NEWS

## चेक न वटल्याप्रकरणी आरोपीस ६ महिने कारावासाची शिक्षा

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

व्यवहारापोटी देण्यात आलेला चेक न वटल्याप्रकरणी आरोपी भैरु होळकर यांना अहिल्यानगर न्यायालयाने सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे. फिर्यादी विवेक सुरेश तवले यांच्याकडून आरोपी यांनी हातउसने ३ लाख रुपये रक्कम घेतली होती. त्या रक्कमेची फिर्यादी तवले आरोपीकडे मागणी केली, असता आरोपीने फिर्यादी तवले यांना ३ लाख रुपयांचा चेक दिला होता. तो चेक फिर्यादी तवले यांनी त्यांच्या बँक खात्यात भरला होता. तो न वटता परत आला, म्हणून आरोपी होळकर विरुद्ध नि. ई. ॲक्ट कलम १३८ अन्वये फिर्यादी तवले यांनी एस. टी.सी. केस नंबर ४९२८/२०२२ ची अहमदनगर येथील अति. न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केली होती. या सुनावणीत आरोपी होळकर यास फिर्यादी तवले यांचे कायदेशीर देणे लागत असल्याचा ॲड. भगतसिंग गर्जे यांनी युक्तीवाद केला. तो युक्तीवाद न्यायालयाने ग्राह्य धरुन केसमधील आरोपी भैरु होळकर सहा महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली. फिर्यादीच्यावतीने ॲड भगतसिंग गर्जे यांनी काम पाहिले, त्यांना ज्येष्ठ वकील पोपट टी. पालवे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



# नगरसेवक निलेश रोकडे यांचा स्वखर्चातून स्वच्छतेचा आदर्श

### जेसीबीच्या साहाय्याने बाभळी, गवत व कचरा हटवून प्रोफेसर कॉलनी परिसर केला स्वच्छ





शेवगाव : स्वच्छता करण्याअगोदरचा प्रोफेसर कॉलनी परिसर व स्वखर्चाने स्वच्छता केल्या नंतर चकाचक दिसणारा परिसर.

जनतेची सेवा हाच माझा संकल्प आहे. स्वच्छ, सुंदर आणि निरोगी प्रभाग घडविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध असून नागरिकांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य देत राहणार आहे. प्रशासनाच्या मदतीची वाट न पाहता आवश्यक ठिकाणी लोकहिताची कामे करण्याचा माझा प्रयत्न कायम राहील.

**– निलेश फुलचंद रोकडे,**
नगरसेवक, नगरपरिषद, शेवगाव

**शेवगाव । वीरभूमी –**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत शेवगाव शहरातील प्रोफेसर कॉलनी परिसरात नगरसेवक निलेश फुलचंद रोकडे यांनी स्वखर्चातून व्यापक स्वच्छता मोहीम राबवून परिसराला नवसंजीवनी दिली. कोणत्याही शासकीय निधीची प्रतीक्षा न करता जेसीबीच्या साहाय्याने मोकळ्या जागेतील बाभळीची झाडे, वाढलेले गवत, कचरा व साचलेली घाण हटविण्यात आली. त्यामुळे परिसरातील डासांच्या वाढत्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यास मोठी मदत होणार आहे.

प्रोफेसर कॉलनीतील मोकळ्या जागेत पावसामुळे मोठ्या प्रमाणात काटेरी बाभळी, रानगवत आणि कचरा साचला होता. अनेक ठिकाणी पाण्याची डबकी तयार झाल्याने डासांची उत्पत्ती वाढून नागरिकांच्या आरोग्यावर धोका निर्माण झाला होता. याबाबत स्थानिक नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर नगरसेवक निलेश रोकडे यांनी तत्काळ दखल घेत स्वखर्चातून संपूर्ण परिसराची साफसफाई करण्याचा निर्णय घेतला.

या मोहिमेत जेसीबीच्या सहाय्याने संपूर्ण जागेतील बाभळीची झाडे, गवत आणि कचरा हटविण्यात आला. तसेच आदरणीय गरुड मॅडम यांच्या घराच्या गेटच्या आतील बाजूस मोठ्या प्रमाणात साचलेले घाण पाणी बाहेर काढून परिसर पूर्णपणे कोरडा करण्यात आला. त्यामुळे दुर्गंधी कमी होण्यासह डासांच्या उत्पत्तीला आळा बसणार असून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनला आहे.

पावसाळ्यात साथीच्या आजारांचा धोका वाढत असताना वेळेत करण्यात आलेली ही स्वच्छता मोहीम नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे. परिसरातील रहिवाशांनी या उपक्रमाचे स्वागत करत नगरसेवक रोकडे यांच्या तत्परतेचे कौतुक केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेत नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असलेले प्रश्न तातडीने सोडविल्यास स्वच्छता आणि आरोग्य संवर्धनाला निश्चितच चालना मिळू शकते, अशी प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली असून नगरसेवक निलेश रोकडे यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.

# ‘वृद्धेश्वर’च्या दोन जागांसाठी ६५.२३ टक्के मतदान

### राजळे गटाच्या १७ जागा बिनविरोध । कासार पिंपळगाव गटातील तिरंगी लढतीकडे लक्ष

**पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्याची कामधेनू असलेल्या श्री वृद्धेश्वर सहकारी कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत ऊस उत्पादक मतदार संघाच्या कासार पिंपळगाव गटारतील दोन जागांसाठी झालेल्या निवडणुकीत ६५.२३ टक्के मतदान झाले. या निवडणुकीत एकूण ८ हजार ७०८ मतदारांपैकी ५ हजार ६८० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखालील आदिनाथ शेतकरी विकास मंडळाने १९ पैकी १७ जागा बिनविरोध जिंकत कारखान्याची सत्ता आधीच ताब्यात घेतली आहे.



कासार पिंपळगाव गटातील दोन जागेसाठी झालेल्या निवडणुकीसाठी ८ मतदान केंद्र तयार करण्यात आले होते. मतदानासाठी आदिनाथनगर येथील न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक विद्यालयात सकाळी आठ वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. सुरुवातीला संथगतीने चाललेल्या मतदानाने दहा वाजेनंतर वेग घेतला. दुपारी चार वाजेपर्यंत मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. निवडणूक प्रक्रिया बॅलेट पेपरवर पार पडल्याने मतदानासाठी वेळ लागत होता. अनेक वृद्ध सभासदांनी व्हीलचेअरचा आधार घेत आपला मतदानाचा हक्क बजावला.

केंद्र निहाय मतदान आकडेवारी पुढील प्रमाणे (कंसात एकुण मतदान)– कासार पिंपळगाव गट १– ८०० (९७६), क्र. २– ५६४ (८५५), चितळी क्र. १– ७०१ (९४४), क्र. २– ४६६ (७७५), कोरडगाव क्र. १– ८११ (१२८६), पाथर्डी क्र. १–८६५ (१२७१), मिरी क्र. १– ८०२ (१३६७), टाकळीमानूर क्र. १– ६७१ (१२३४) असे एकूण ८७०८ पैकी ५६८० शांततेत मतदान झाले. या मतदानाची टक्केवारी ६५.२३ टक्के इतकी आहे.

कासार पिंपळगाव गटातून निवडून देण्याच्या दोन जागेसाठी आप्पासाहेब राजळे, शिवशंकर राजळे व उद्धव वाघ असे तीन अर्ज राहिल्याने येथील दोन जागांसाठी आज शांतेत मतदान झाले. मतदान केंद्रावर दिवसभर आमदार मोनिका राजळे, राहुल राजळे, कासार पिंपळगावच्या सरपंच मोनाली राजळे तसेच उमेदवार शिवशंकर राजळे मतदान केंद्रावर उपस्थित होते. कारखान्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण तालुका आणि शेवगाव तालुक्यातील काही गावे असल्याने मतदार वाहनांनी आले होते, ज्यामुळे परिसरात वाहनांची मोठी गर्दी झाली होती.

कारखान्याची सत्ता आमदार राजळे गटाच्या ताब्यात असली तरी, निवडणुकीत उभे असलेले तीनही उमेदवार एकमेकांचे जवळचे नातेवाईक आहेत. जवळपास चार टर्मनंतर दोन जागांसाठी का होईना पण कारखान्याची निवडणूक होत असल्याने संपूर्ण तालुक्याच्या राजकीय वर्तुळाचे या निकालाकडे लक्ष लागले आहे.

मतदान केंद्रावर आमदार राजळे गटाचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्या तुलनेत शिवशंकर राजळे यांची यंत्रणा तोकडी दिसली. या निवडणुकीची मतमोजणी पाथर्डी येथील तहसील कार्यालयात होणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रसाद मते आणि तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी लक्ष ठेवून होते.

# पुणे विभागातील २२ शेतकऱ्यांना विविध कृषी पुरस्कार जाहीर; १ जुलै कृषी दिनी वितरण

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

पुणे विभागातील पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील कृषी फलोत्पादन आणि संलग्न क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २२ शेतकऱ्यांना विविध कृषी पुरस्कार जाहीर झाले असून १ जुलै रोजी कृषी दिनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी कळविली आहे.

कृषी उत्पादन आणि उत्पन्न वाढीकरीता योगदान देणाऱ्या शेतकऱ्यांचा आणि कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी करणाऱ्या व्यक्ती, संस्था, गट, अधिकारी, कर्मचारी यांना महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), उद्यान पंडीत, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, पीकस्पर्धा विजेते, पद्मश्री. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि सेवारत्न पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.

विविध कृषी पुरस्कार सन २०२३ व सन २०२४ साठी महाराष्ट्र राज्यातून अनुक्रमे ९१ व ९८ शेतकरी, कर्मचारी यांना शेतकरी व कृषि विस्तारामध्ये बहुमोल कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत पुरस्कार जाहीर झाले. एकूण पुरस्कारप्राप्त शेतक–यांपैकी पुणे विभागातील अहिल्यानगर, पुणे व सोलापूर येथील २२ शेतकरी, कर्मचारी यांची निवड झाली आहे. अहिल्यानगर ५, पुणे ८ व सोलापूर जिल्ह्यातील ९ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

पुरस्कार वितरण सोहळा डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई–१८ येथे आयोजीत करण्यात आला आहे.

### सन २०२४ मधील पुरस्कार विजेते

समीर मोहनराव डोंबे (खोर, पुणे), छाया तानाजी पवार (कुरणेवाडी, पुणे), खुशालचंद्र बाबासाहेब मोरे (बारलोणी, सोलापूर), योगेश नामदेव धनगर (तांदुळवाडी, पुणे), सुरज सुखदेव अवताडे (एखतपूर, सोलापूर), अमर अशोकराव भोसले (सराटी, पुणे), गोवर्धन प्रल्हाद खेडकर (भालगाव, अहिल्यानगर), संतोष भिकाजी धुमाळ (पेठ, पुणे), गंगाधर प्रफुल्लचंद्र बिराजदार (निंबर्गी, सोलापूर), शंकर जगन्नाथ केंगले (डोण, पुणे), सुखदेव ज्ञानदेव जमधडे (शेवगाव, अहिल्यानगर).

### सन २०२३ मधील पुरस्कार विजेते

शिवानंद मल्लेशी शिंगडगाव (मंद्रूप, सोलापूर), श्रद्धा सत्यवान ढवन (मोरवाडी अहिल्यानगर), कांतीलाल किसन नलगे (नागरगाव, पुणे), प्रवीण दिलीप माने (बैरागवाडी, सोलापूर), राहूल भारत बनकर (करकंब, सोलापूर), सदाशिव मनोहर चौघुले (जुजारपूर, सोलापूर), गणपतराव बाळासाहेब शिंदे (रहिमतपूर, अहिल्यानगर), यतीन बापूराव घुले (काटेवाडी, पुणे), प्रणव राजकुमार बिराजदार (निंबर्गी, सोलापूर), आदिवासी एकता शेतकरी गट (गुंजाळवाडी, अहिल्यानगर), नविनचंद्र हरिश्चंद्र बोराडे, उपकृषी अधिकारी (मावळ, पुणे)

# कोपरगावात काका कोयटे व सुधीर डागा यांचा व्यापाऱ्यांकडून सत्कार

**कोपरगाव । वीरभूमी–**

काका कोयटे आणि सुधीर डागा यांची राज्यस्तरीय महत्त्वाच्या पदांवर झालेली निवड ही केवळ त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून संपूर्ण कोपरगावच्या व्यापारी व सहकार क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या नेतृत्व, दूरदृष्टी आणि सातत्यपूर्ण कार्यामुळे कोपरगावचे नाव राज्यभर पोहोचले असून भविष्यातही व्यापारी, उद्योजक आणि सहकार क्षेत्राच्या विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन लाभदायी ठरणार असल्याचा विश्वास कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे सचिव प्रदीप साखरे यांनी व्यक्त केला.

राज्यातील अग्रगण्य समता नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन, कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा कोपरगाव तालुका किराणा मर्चंट असोसिएशनचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांची महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या कार्यकारी अध्यक्षपदी, तसेच कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष सुधीर डागा यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कोपरगाव शहरातील समस्त व्यापारी व किराणा दुकानदारांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा गाव तिथे उद्योजक हा उपक्रम आणि कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचा मेक इन कोपरगाव हा उपक्रम कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने लवकरच हाती घेणार आहोत.

**– ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे,**
अध्यक्ष, कोपरगाव तालुका व्यापारी महासंघ

यावेळी व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष अजित लोहाडे, खजिनदार तुलसीदास खुबानी, सचिव प्रदीप साखरे, महावीर सोनी, गुलशन होडे, किरण शिरोडे, आनंद लोढा, युवराज गांगवे, आशुतोष पटवर्धन, सुमित भट्टड, उल्हास गवारे, श्याम जंगम, पप्पूशेठ मुंदडा, प्रीतम बंब, यश विसपुते, नारायण लांडगे, धीरज कराचीवाला, हर्षल कृष्णानी, मानव शुक्ला, हर्षल जोशी यांच्यासह विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी, किराणा व्यावसायिक आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी काका कोयटे आणि सुधीर डागा यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांचा पुष्पहार, शाल, श्रीफळ देऊन अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी काका कोयटे यांच्या सहकार क्षेत्रातील दीर्घ अनुभवाचा आणि सुधीर डागा यांच्या व्यापारी संघटनांमधील कार्याचा गौरव केला. त्यांच्या निवडीमुळे कोपरगावच्या व्यापारी व सहकार क्षेत्राला राज्यस्तरावर अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# ढोरजेच्या बारवेवरील शिलालेखातून उलगडला १७८२ चा इतिहास

## अठराव्या शतकातील जलव्यवस्था, ग्रामीण प्रशासन व लोककल्याणकारी परंपरेचा महत्त्वपूर्ण पुरावा

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –** तालुक्यातील ढोरजे येथील गाव हद्दीत असलेल्या एका प्राचीन नंदा प्रकारच्या बारवेवर कोरलेला शिलालेख अठराव्या शतकातील ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि जलव्यवस्थेच्या इतिहासावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण पुरावा ठरत आहे. बारवेच्या पायऱ्या उतरताना उजव्या बाजूस हा शिलालेख कोरलेला असून तो उठाव स्वरूपातील सहा ओळींचा देवनागरी लिपीतील मराठी भाषेतील लेख आहे.

अनेक वर्षे उघड्यावर असल्याने शिलालेखावरील अक्षरांवर वातावरणाचा परिणाम झाला आहे. काही अक्षरे झिजली असून काही ठिकाणी लेख तुटलेला दिसतो. मात्र शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर अथक परिश्रमातून संपूर्ण मजकूर वाचण्यात यश आले.

**शिलालेखाचे मूळ वाचन**

**१. श्री विश्वनाथ चरणि तत्पर**
**२. देवजिराम व कासिराम व**
**३. जावजिराम जोतिसी कुळ**
**४. कर्णी मौजे ढोरजे ता।।रांजन**
**५. गाव नीरंतर सके १७०४ शुभ**
**६. कृत संवत्सरे मार्गसीष**

शिलालेखाचा अर्थ : श्री विश्वनाथ चरणी तत्पर असा भक्तिभाव व्यक्त करणारे मौजे ढोरजे, तर्फे रांजणगाव येथील ज्योतिषी व कुळकर्णी देवजिराम, कासिराम आणि जावजिराम या तिघा भावांनी शालिवाहन शक १७०४, शुभकृत नाम संवत्सर, मार्गशीर्ष महिन्यात म्हणजेच इ.स. १७८२ च्या सुमारास ही बारव बांधून पूर्ण केली.

हा शिलालेख केवळ दगडावर कोरलेला लेख नसून तत्कालीन समाजजीवनाचा जिवंत दस्तऐवज आहे. श्री विश्वनाथ चरणी तत्पर या उल्लेखातून त्या काळातील धार्मिक श्रद्धा आणि सार्वजनिक कामांना असलेले धार्मिक अधिष्ठान स्पष्ट होते. लोकहिताची कामे ही ईश्वरसेवा मानण्याची परंपरा त्या काळात दृढ होती.

शिलालेखात उल्लेख असलेले देवजिराम, कासिराम आणि जावजिराम हे ज्योतिषी व कुळकर्णी होते. कुळकर्णी हे गावपातळीवरील महत्त्वाचे प्रशासकीय अधिकारी मानले जात. महसूल नोंदी, जमिनीचे व्यवहार आणि गावच्या दप्तरी कामकाजाची जबाबदारी त्यांच्यावर असे. त्यामुळे या लेखातून अठराव्या शतकातील ग्रामीण प्रशासन व्यवस्था आणि स्थानिक प्रतिष्ठित कुटुंबांची समाजातील भूमिका अधोरेखित होते.





शालिवाहन शक १७०४ असा स्पष्ट कालोल्लेख असल्याने या बांधकामाचा निश्चित ऐतिहासिक काळ समजतो. त्या काळात कोरडवाहू भागात पाण्याची तीव्र गरज लक्षात घेऊन गावोगावी विहिरी, बारवा आणि इतर जलस्रोत उभारण्याची परंपरा होती. ढोरजे येथील ही बारव त्या परंपरेचे उत्तम उदाहरण ठरते.

देवजीराम, कासीराम आणि जावजीराम या तिघा भावांनी बांधलेली ही बारव गावातील पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासोबतच शेतीसाठीही उपयुक्त ठरत असावी. शेतीप्रधान ग्रामीण समाजात अशा जलस्रोतांचे अत्यंत महत्त्व होते. पाणी हीच जीवनवाहिनी मानली जात असताना लोककल्याणाच्या भावनेतून उभारलेले हे बांधकाम त्या काळातील सामाजिक जबाबदारीचे प्रतीक मानावे लागेल.

ही बारव म्हणजे केवळ पाण्याची सोय नव्हे, तर आपल्या कुलदैवताच्या चरणी तत्पर राहून समाजासाठी केलेल्या कार्याची जपलेली स्मृती आहे.

ढोरजे येथील हा शिलालेख गावाच्या ऐतिहासिक अस्तित्वाचा ठोस पुरावा असून अठराव्या शतकातील जलसंधारण परंपरा, ग्रामीण प्रशासन व्यवस्था आणि स्थानिक अधिकारी वर्गाच्या समाजोपयोगी कार्याची महत्त्वपूर्ण नोंद म्हणून अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील लोककल्याणकारी बांधकामांची परंपरा आणि समाजजीवन समजून घेण्यासाठी हा शिलालेख महत्त्वाचा दुवा ठरतो.

या शिलालेखाचे संशोधन राजेश इंगळे यांनी केले असून वाचन, माहिती संकलन शिलालेख वाचक अनिल दुधाणे यांनी केले आहे. माहिती संकलनही अनिल दुधाणे यांचे आहे. शिलालेखाचा शोध, छाप व छायाचित्रणासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचलित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीच्या वतीने मारुती वागस्कर, गणेश कुदांडे, डॉ. चंद्रशेखर कळमकर, संकेत नलगे, संकेत लगड, सोमेश शिंदे आणि अक्षय गायकवाड यांनी सहकार्य केले.

# कोळपेवाडी-सुरेगाव रस्त्याचे काम दोन वर्षांपासून रखडले; आ. काळेंकडून नागरिकांची दिशाभूल

## कामं तातडीने पूर्ण करण्याची संचालक विलासराव वाबळे यांची मागणी

● **कोपरगाव । वीरभूमी–** तालुक्यातील ग्रामीण भागाच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या कोळपेवाडी-सुरेगाव १०.०१ कोटी रुपये निधीतून होणारे सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्याचे काम मागील दोन वर्षांपासून पूर्णपणे बंद पडलेले असून, प्रत्यक्षात सुमारे ४.८ किलोमीटर लांबीच्या या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणारे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, शेतकरी व वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विद्यमान लोकप्रतिनिधीकडून कामाबाबत मोठी दिशाभूल करण्यात आलेली असून रस्त्याचे काम पूर्ण न करताच मागील २० महिन्यांपूर्वीच याचे लोप्रतिनिधींनी उद्घाटन करण्यात आल्याचा आरोप स्व. शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक विलासराव वाबळे यांनी केला आहे.

संचालक विलासराव वाबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत एस.एच.-०७ ते कोळपेवाडी-सुरेगाव (कि.मी. ०/० ते ४/८००) या ४.८ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे काम दि. ९ ऑक्टोबर २०२४ रोजी सुरू करण्यात आले. १०.०१ कोटी रुपये खर्चाच्या या कामाचे नियोजन ८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही प्रत्यक्षात काम रखडले असून जवळपास दोन वर्षांपासून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. संबंधित ठेकेदाराला काम वेळेत पूर्ण करण्याबाबत कोणत्याही प्रकारच्या प्रभावी सूचना देण्यात आल्या नसल्याने हे काम दीर्घकाळ रखडले आहे. या अपूर्ण रस्त्यामुळे दररोज प्रवास करणारे असंख्य वाहनचालक, विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून खड्ड्यांमुळे सातत्याने लहान-मोठे अपघात घडत आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

ते पुढे म्हणाले की, सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर आमदार आशुतोष काळे यांनी मतदारसंघात विविध विकासकामे करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र ही विकासकामे आजही कागदावरच असून प्रत्यक्षात अनेक कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची कामे रखडल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. याचा सर्वाधिक फटका विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि वाहनचालकांना बसत असून दररोज खड्डेमय रस्त्यांवर अपघातांची मालिका सुरू आहे.

एकीकडे रस्त्याचे काम पूर्ण झाल्याप्रमाणे माहिती दर्शविणारे फलक झळकवले जात आहेत, तर दुसरीकडे प्रत्यक्षात रस्त्याचे कामच पूर्ण झालेले दिसत नाही. आमदार आशुतोष काळे यांच्या कारखान्याकडे जाणाऱ्या रस्त्याचेच पूर्ण वाभाडे निघाले असून तो ठिकठिकाणी खड्ड्यांनी व्यापलेला आहे.

यासंदर्भात वाबळे यांनी आरोप केला की, आमदार आशुतोष काळे यांनी विकासकामांच्या नावाखाली सर्वसामान्य मतदार व नागरिकांच्या डोळ्यांत धूळफेक केली आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. त्यामुळे केवळ उद्घाटने आणि फलकबाजी न करता रखडलेली विकासकामे तातडीने पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा.

वस्तुस्थिती पाहता रस्त्याचे काम दिलेल्या कालावधीत पूर्ण झालेले नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. कोळपेवाडी-सुरेगाव हा ग्रामीण भागातील अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून, या ४.८ किलोमीटर रस्त्याचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून गावठाण परिसरातील रस्ता काँक्रिटीकरणासह नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि खड्डेमुक्त रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी संचालक विलासराव वाबळे यांनी केली आहे.

# अकोले पोलिसांच्या कारवाईत पेढेवाडी शाळा-अंगणवाडी घरफोडी प्रकरणी दोन आरोपी अटकेत

● **अकोले । वीरभूमी–** अकोले पोलिसांनी पेढेवाडी येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीतील घरफोडी प्रकरणाचा छडा लावत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे मारुती रावजी कुलाळ (वय ३१ वर्षे) व काळू चिंधू कुलाळ (वय ३५ वर्षे) अशी असून दोघेही रा. पेढेवाडी, ता. अकोले येथील आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, पेढेवाडी येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीच्या इमारतीतील लोखंडी गेटचे कडी-कोयंडे तोडून आरोपींनी आत प्रवेश केला होता. त्यांनी विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी ठेवलेले साहित्य, एचपी कंपनीची गॅस टाकी, भारत गॅसच्या दोन टाक्या, शेगडी तसेच सुमारे १५० किलो तांदूळ, मुगडाळ, गहू भरडा, साखर, तेल, वाटाणा, मसाले, मसूरडाळ आदी साहित्य चोरून नेले होते.

या प्रकरणी ११ जून २०२६ रोजी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक एस. आर. कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असताना गुप्त माहितीच्या आधारे आरोपींची नावे निष्पन्न झाली. त्यानंतर पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

तपासादरम्यान आरोपींकडून तीन गॅस टाक्या, शेगडी, तांदूळ, कडधान्ये तसेच हिरो होंडा मोटारसायकल (क्र. MH-AC-7830) असा एकूण १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक एस. आर. कोळी यांच्या नेतृत्वाखाली पोसई विनोद खांडबहाले, पोहेकॉ. खाडे, पोका. मनोहर मोरे, पोका. काळे व पोका. भालेराव यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा जागर आवश्यक

## अशोक सिब्बल । समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

● **अहिल्यानगर । वीरभूमी–** राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकराजा आणि तत्त्वज्ञ होते. लोककल्याणाची भूमिका त्यांनी कायम जोपासली आणि त्यानुसार अनेक लोकहितकारी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली. आजच्या काळात राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे स्मरण, जतन आणि प्रसार करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन प्रमुख व्याख्याते अशोक सिब्बल यांनी केले.

समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयातील सभागृहात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, विशेष अधिकारी सावित्रा लबडे, सहाय्यक लेखाधिकारी संदीप देठे, रेनाविकार विद्यालयाचे प्राचार्य राजेश भालसिंग, बार्टीचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख व्याख्याते अशोक सिब्बल म्हणाले, सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून काम करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांचा इतिहास प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचे स्मरण आणि आचरण आजच्या काळात अधिक आवश्यक आहे. त्यांनी वैचारिक प्रबोधनाचा वारसा समाजाला दिला. सर्वधर्मसमभावाचा संदेश त्यांनी केवळ दिला नाही, तर तो प्रत्यक्ष कृतीतूनही सिद्ध केला.

सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून शिक्षणाचा विस्तार, महिलांच्या सक्षमीकरणासाठी कायदे व धोरणे, आरक्षणाची अंमलबजावणी, सर्व धर्मीयांना समान रोजगाराच्या संधी, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता, सहकारी संस्थांची उभारणी, औद्योगिक विकासाला चालना तसेच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. समानतेच्या तत्त्वावर सर्वांना संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा दृष्टिकोन आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.



प्राचार्य राजेश भालसिंग म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून दरवर्षी विविध उपक्रमांनी साजरी केली जाते. ते समाजातील दुर्बल व वंचित घटकांचा आधारस्तंभ होते. बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत समाजहिताचे आचरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सूत्रसंचालन शिवानी शिंगवी यांनी केले, तर आभार प्रदर्शन विशेष अधिकारी सावित्रा लबडे यांनी केले.

कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, विविध शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, बार्टीचे समतादूत तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### समता दिंडीस उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दिंडीस प्रारंभ झाला. या दिंडीत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले असून दिंडीस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.